स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड

मानव्यविद्या शाखेअंतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवी करीता सादर करावयाचा

संशोधन आराखडा (SYNOPSIS)

संशोधन विषय

‘प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या निवडक आत्मचरित्रांचा चिकित्सक अभ्यास’

: संशोधक :

मोगल अनंत उध्दवराव

एम.ए. (मराठी) नेट, बी.एड.

: : मार्गदर्शक : :

डॉ. झोडगे राजाराम अंकुशराव

मराठी विभागप्रमुख

नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी

२०२२

‘प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या निवडक आत्मचरित्रांचा चिकित्सक अभ्यास’

प्रस्तावना:

मराठी वाङ्मयामध्ये कथा, कादंबरी, कविता, नाटक, चरित्र तसेच आत्मचरित्र इत्यादी विविध प्रकारांमध्ये लेखन होत असते. मराठीमध्ये आत्मचरित्र या प्रकारात विपूल लेखन झालेले आहे. त्यात वाङ्मयीन क्षेत्रातील व्यक्तींनी ज्या प्रमाणात आत्मचरित्रे लिहिले त्याच पद्धतीने वाङ्मयबाह्य क्षेत्रातील व्यक्तींनी देखील आत्मचरित्रपर लेखन केलेले दिसून येते. राजकीयक्षेत्र, समाजसेवक, समाजसुधारक, डॉक्टर, शिक्षक, वकील, न्यायाधीश, उद्योगक्षेत्रांतील व्यक्ती, प्रकाशक, चित्रकार, खेळाडू, पत्रकार, चित्रपट कलावंत, संगीतकार, गायक, लेखक, विविध जाती जमातीतील व्यक्ती, गृहिणी, साहित्यातील प्रसिद्ध लेखकांच्या पत्नी इ. विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तींची आत्मचरित्रेही लिहिली गेलेली दिसतात.

यातच अलिकडच्या काळात खूप मोठ्या प्रमाणात मराठी माध्यमांच्या शाळेत शिकून, संघर्ष करत आपल्या जीवनातील इच्छित ध्येय स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून गाठत, आपल्या ध्येयाला गवसणी घालणाऱ्या प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची आत्मचरित्रेही खूप मोठ्या प्रमाणात लिहिली गेली. संबंधितांच्या आत्मचरित्रातून त्यांची एक अधिकारी होण्यापर्यंतची जी ध्येयवेडी कहाणी आहे ती मांडण्याचा प्रयत्न या अधिकारी लेखकांनी केलेला दिसून येतो. आत्मचरित्रातून स्वत:ला आलेल्या अडचणी, स्वत:मधील दोष, चुका प्रामाणिकपणे मांडण्याची तटस्थ वृत्ती ठेऊन हे लेखन केलेले दिसते.

प्रामुख्याने मराठी साहित्यात जे विविध प्रवाह निर्माण झाले त्याच प्रवाहात सहजपणाने प्रशासकीय सेवेत निवड झालेल्या अधिकाऱ्यानींही आपले स्वानुभव मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण समीक्षकांनी मात्र यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले दिसते. ज्यापद्धतीने वाङ्मयीन क्षेत्रात कार्य करणाऱ्या लेखकांच्या आत्मचरित्रांची, स्वकथनांची चर्चा होताना दिसते. त्या पद्धतीने प्रशासकीय सेवेत कार्यरत अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्रांची समीक्षा फारशी झालेली दिसत नाही. ही सर्व

आत्मचरित्रे वाचनीय व अभ्यासनीय आहेत. त्या आत्मचरित्रातील काही ठराविक आत्मचरित्रांचा अभ्यास प्रस्तुत संशोधन कार्याच्या माध्यमातून करण्याचा हा प्रयत्न आहे.

येथे इ.स. २००० ते २०२० या कालखंडातील काही निवडक आत्मचरित्रे अभ्यासासाठी निवडली आहेत. यात ‘मन में है विश्वास’(विश्वास नांगरे पाटील), ‘धडपडणाऱ्या तरूणाईसाठी’(संदीपकुमार साळुंके),‘ताई मी कलेक्टर व्हयनू’ (राजेश पाटील), ‘इथे थांबणे नाही’(रमेश घोलप), ‘गरुडझेप’(भरत आंधळे), ‘नाना मी साह्यब झालो’ (विष्णू औटी), ‘मी एक स्वप्न पाहिलं’(डॉ. राजेंद्र कमलाताई भारूड), ‘फिटे अंधाराचे जाळे’(कृष्ण गोपाल तिवारी) या निवडक आत्मचरित्रांचा अभ्यास करावयाचा आहे.

संशोधनाची आवश्यकता :

स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून प्रशासकीय सेवेत आलेल्या अधिकाऱ्यांनी आपला जीवनसंघर्ष हा आत्मचरित्रांच्या किंवा आत्मकथनपर लेखनाच्या माध्यमांतून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लिहिलेली सर्वच आत्मकथने ही आजच्या काळात पदवी व पदव्यूत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत. खूप मोठ्या प्रमाणात या आत्मचरित्रांचा वाचकवर्ग हा स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वरूपातील आहे असे दिसते. एक प्रेरणादायी उर्जा देणारे कथन तरूणाईला वाटत असते. असे असले तरी या सर्व आत्मचरित्रांची आपल्याला वाङ्मयीन मूल्ये तपासायची आहेत. त्या गरजेमुळेच अशा आत्मचरित्रांची संशोधनासाठी निवड केली आहे. यापूर्वी आत्मचरित्राच्या अंगाने खूप मोठ्या प्रमाणात संशोधन झालेले दिसते. जसे की वाङ्मयीन क्षेत्रात काम करणाऱ्या लेखकांची आत्मचरित्र, डॉक्टरांची आत्मचरित्र, दलित आत्मकथने इ. विषयावर संशोधन झालेले आहे. पूर्वाभ्यास झालेला आहे. परंतु प्रशासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्रावर संशोधन कार्य झाले नाही. हे संशोधन करत असताना त्या त्या अधिकाऱ्यांच्या जीवन प्रवासाबरोबरच त्यांनी लिहिलेल्या आत्मचरित्र लेखनामागची प्रेरणा, काळ, त्यांची निवेदन शैली, भाषाशैली शिवाय

प्रशासनात काम करीत असताना त्यांच्या उल्लेखनीय कार्याच्या नोंदी, शिवाय त्यांनी मांडलेली मते व आज त्यांचा प्रशासनातील कामाचा प्रत्यक्ष अनुभव इ. बाबी समजून घ्यावयाच्या आहेत. या भूमिकेतूनच हे संशोधन करण्याचा प्रयत्न आहे.

निवडलेल्या या आत्मचरित्रातून प्रत्येक आत्मचरित्रकाराच्या नायकाने आपल्या शालेय जीवनापासून ते प्रशासकीय अधिकारी होण्यापर्यंतच्या प्रवासाचं चित्रण केलेले दिसते. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीतही आपण ध्येय प्राप्त केले ते करताना जो संघर्ष होता तो मांडला आहे. सर्वसामान्यपणे मध्यम वर्गीय कुटुंबाची पार्श्वभूमी असणारे हे सर्वच जण आपल्या अभ्यासातून सातत्याने कठोर मेहनत, जिद्द उराशी बाळगुन यांनी हे यश संपादन केलेले दिसते. तसेच काही अधिकाऱ्यांची सुरूवातीची परिस्थिती ही बिकट असून त्यांची रोजच्या भाकरीसाठीची लढाई ही होतीच, पण अभ्यासातील सातत्य असल्याने यशप्राप्ती होते असे व्यक्त होताना दिसते. त्यामुळेच एक भाषेविषयीची आस्था, आपुलकी, प्रेम, वाचनाची आवड इत्यादी दृष्टीकोनातून या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास करण्याचा हेतू आहे. प्रशासनातील अधिकारी म्हणून काम करताना जी नैतिक मूल्यांची चौकट असते ती चौकट संबंधित अधिकारी पाळतात का? हे ही या माध्यमातून तपासता येईल. त्यासाठीच या अभ्यास विषयाची निवड संशोधनासाठी केलेली आहे.

संशोधनाची उदिष्ट्ये :

प्रशासकीय अधिकाऱ्यांची आत्मचरित्रे ही वैविध्यपूर्ण आहेत त्याचा अभ्यास करतांना पुढील उद्दीष्ट्ये ही विचाराधीन आहेत.

- प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्र लेखनामागील प्रेरणा समजून घेणे.
- प्रशासकीय क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्रातून आलेल्या सामाजिक दृष्टीकोनाचे स्वरूप उलगडणे.
- आत्मचरित्रपर लेखन करणाऱ्या लेखकाचा जीवन संघर्ष समजून घेणे.
- प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्रांचा भाषिक अंगाने अभ्यास करणे.

- प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्रपर लेखनाचा वाङ्‌मयीन दृष्टीकोनातून अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :

- संशोधनासाठी निवडलेल्या अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्रात सामाजिक जाणिवा अभिव्यक्त झालेल्या आहेत.
- अधिकारी म्हणून स्वत:ची जीवन संघर्षाच्या अभिव्यक्तीतून हे लेखन झाले आहे.
- प्रशासकीय क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्रात भाषिक वेगळेपण ठळकपणाने जाणवते.
- प्रशासकीय क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्रातून आत्मचरित्र लेखकांचा तत्कालीन काळ , परिस्थिती इ. प्रभाव जाणवतो.
- हे आत्मचरित्रे तरूण पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहेत.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

'प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्रांचा चिकित्सक अभ्यास' या शीर्षकाखाली पुढील निवडक आत्मचरित्रांचा अभ्यास करण्यात येईल. निवडलेली आत्मचरित्रे ही इ.स. २००० ते २०२० या वीस वर्षाच्या काळातील असून तीही निवडक लेखकांचीच निवडली आहेत. ती पुढीलप्रमाणे 'मन में है विश्वास' (विश्वास नांगरे पाटील), 'धडपडणाऱ्या तरूणाईसाठी' (संदीपकुमार साळुंके), 'ताई मी कलेक्टर व्हयनू' (राजेश पाटील), 'इथे थांबणे नाही' (रमेश घोलप), 'गरुडझेप'(भरत आंधळे), 'नाना मी साह्यब झालो' (विष्णू औटी), 'मी एक स्वप्न पाहिलं' (डॉ. राजेंद्र कमलाताई भारूड), 'फिटे अंधाराचे जाळे' (कृष्ण गोपाल तिवारी) या निवडक आत्मचरित्रांचा अभ्यास करावयाचा आहे.

संशोधन पद्धती :

आज साहित्याच्या संशोधनासाठी विविध संशोधन पद्धती वापरल्या जातात. 'प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्रांचा चिकित्सक अभ्यास' या विषयाच्या संशोधनासाठी चरित्रात्मक संशोधन पद्धती, समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, वर्णनात्मक संशोधन पद्धती, तुलनात्मक या संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

संशोधनाची साधने :

सदर संशोधनासाठी संदर्भ साधने म्हणून पूर्वसूरींचे लेखन, प्रबंध, मुलाखत, संदर्भ ग्रंथ, प्रश्नावली इत्यादी संशोधन स्त्रोतांचा वापर करण्यात येईल. संशोधन सुलभ व दर्जेदार होण्यासाठी संशोधन कार्यास आधारभूत आत्मचरित्रे, संदर्भग्रंथ, शब्दकोश, मासिके, त्रैमासिक, वर्तमानपत्रे, नियतकालिके इ. संशोधन स्त्रोतांचा वापर करण्यात येईल. याशिवाय इतर संशोधकाच्या शोधप्रबंधाचा आधार म्हणून अभ्यास केला जाईल. या शोधप्रबंधातील प्रकरणांची रूपरेषा पुढीलप्रमाणे राहणार आहे.

प्रकरण पहिले : प्रास्ताविक :

प्रस्तुत प्रकरणात प्रबंधलेखनाची भूमिका, व्याप्ती ,मर्यादा व अनूषंगिक बाबींची मांडणी करावयाची आहे. या प्रकरणातून संशोधनासाठी विषयनिवडीची भूमिका, संशोधनाची उदिष्ट्ये संशोधनाची पद्धती, महत्त्व, व्याप्ती, मर्यादा व संशोधनासाठी अभ्याससाधने इ. मुद्यांच्या आधारे प्रबंध लेखनासंदर्भात विवेचन करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : आत्मचरित्र : संकल्पना व स्वरूप

आत्मचरित्र हा एक स्वतंत्र वाङ्मय प्रकार असून या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप व संकल्पना या प्रकरणात स्पष्ट करण्यात आली असून, मराठी वाङ्मयाचा जो आढावा समीक्षकांनी घेतला आहे. ते स्पष्ट करून आत्मचरित्र म्हणजे काय ? त्याची संकल्पना, स्वरूप, आत्मचरित्राची एकूण वाटचाल या प्रकरणातून मांडली आहे.

प्रकरण तिसरे : प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्रातील सामाजिक दृष्टिकोन

प्रस्तुत प्रकरणात प्रशासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्राचे स्वरूप स्पष्ट करावयाचे आहे. त्या आत्मचरित्र लेखनामागील लेखकाच्या प्रेरणा त्यातून मांडून लेखकाच्या जीवनाचा परिचय करण्यात आलेला आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांचा जीवन परिचय करून देणे, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या निवडलेल्या आत्मचरित्राचे स्वरूप समजावून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रशासनातील काम करताना प्रत्यक्ष अधिकाऱ्यांचा समाजाशी संपर्क हा येत असतो. त्यामुळे त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीमुळे तो सामाजिक नाते वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करतो. त्या त्या अधिकाऱ्यांचा सामाजिक दृष्टिकोन त्यांची माणसाबद्दल असणारी तळमळ, काम करण्याची पद्धती या बाबींचा विचार या प्रकरणातून करण्यात येणार आहे. अधिकाऱ्यांच्या सामाजिक दृष्टिकोनाचे स्वरूप अभ्यासले जाणार आहे.

प्रकरण चौथे: प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्रातील जीवनसंघर्षाचे स्वरूप

प्रशासकीय क्षेत्रात अधिकारी म्हणून वावरताना आज जे सुखवस्तु जीवनमान या प्रत्येक अधिकाऱ्यांना मिळालेले असते त्या पाठीमागे त्यांचा संर्घष हा खूप मोठा असतो. यशस्वी झालेल्या या प्रत्येकाने जीवनातील संकटांना धैर्याने, जिद्दीने, संयमाने तोंड दिलेले असते. हा जीवनातील खडतर संघर्ष अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्रात सतत जाणवत असतो. त्या जीवनसंघर्षाचा शोध या प्रकरणातून घेतला जाणार आहे. हा शोध घेण्यासाठी संशोधनाकरीता निवडलेल्या आत्मचरित्रातील अधिकाऱ्यांची जीवनकहाणी ही अभ्यासली जाणार आहे. त्याचा शैक्षणिक, व्यावसायिक. आर्थिक स्वरूपाचा संघर्ष व त्या जीवन संघर्षाचे स्वरूप मांडून शेवटी त्यातील निष्कर्षाची मांडणी करता येईल.

प्रकरण पाचवे : वाङ्मयीन मूल्यमापन

आत्मचरित्राच्या माध्यमातून स्वत: लेखक स्वत:च्या जीवनाची मांडणी करत असतो. म्हणजे तो स्वत:च निवेदनाच्या भूमिकेत वावरत असतो. त्यामुळे ही निवेदन शैली प्रत्येकाची आपापल्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे बदलणार असते. लेखक ज्या काळात, परिस्थितीत व प्रदेशात वावरला, जगला, वाढला, शिकला सवरला त्याचाही परिणाम त्याच्या निवेदन शैलीवर पडत असतो. प्रशासनात काम करणाऱ्या या सर्व अधिकाऱ्यांच्या मध्ये त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचा परिणाम हा निवेदनशैली बरोबरच भाषाशैलीवर ही प्रभाव पडलेला दिसून येतो. त्याचाच अभ्यास प्रस्तुत प्रकरणातून केला जाणार आहे. तो ज्या परिसरातून आला त्या परिसरातील बोलीचा प्रभाव, नागर भाषेचा प्रभाव हा त्याच्या लेखनावरही पडलेला दिसतो. या भाषिक वेगळेपणाचा शोध याठिकाणी घ्यायचा आहे. १. प्रशासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्राची निवेदन शैली २. भाषिक वेगळेपण ३. म्हणी व वाक्प्रचार ४. बोली भाषेतील विविध शब्द व त्याचे अर्थ इत्यादी मुद्यांच्या आधारे वाङ्मयीन मुल्यमापन केले जाईल.

प्रकरण सहावे : उपसंहार व निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणात एकूण संशोधन अभ्यासाचा थोडक्यात आढावा घेऊन या अभ्यासाच्या आधारावर निष्कर्ष संपादीत करण्यात येतील.

प्रस्तुत संशोधन आराखडा हा प्राथमिक स्वरूपाचा असून भविष्यात यामध्ये काही बदल करणे आवश्यक वाटल्यास करण्यात येतील.

संदर्भ सूची :

१. हस्तक उषा, मराठीतील आत्मचरित्रपर लेखन, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस, पुणे,२००६.

२. यादव आनंद, आत्मचरित्र मीमांसा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९८.

३. जोशी अ. म., प्रदिक्षिणा खंड, १ व २, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,२००७.

४. कऱ्हाडे स. दा., चरित्र आणि आत्मचरित्र, लोक वाङ्मय गृह, मुंबई,

५. पाटील नांगरे विश्वास, मन में है विश्वास, राजहंस प्रकाशन प्रा. लि.,२०१६.

६. साळुंके संदीपकुमार, 'धडपडणाऱ्या तरूणाईसाठी', राजहंस प्रकाशन प्रा. लि. २०१०.

७. पाटील राजेश, ताई मी कलेक्टर व्हयनू, ग्रंथाली प्रकाशन, २००८.

८. घोलप रमेश गोरख, इथे थांबणे नाही (एक जीवन प्रवास), उमेद प्रकाशन, २०१७.

९. औटी विष्णू नाना, मी साह्यब झालो, युनिक अॅकॅडमी पब्लिकेशन प्रा.लि.२०१७.

१०. तिवारी कृष्ण गोपाल, फिटे अंधाराचे जाळे, दीपस्तंभ प्रकाशन,२०१९.

११. भारूड राजेंद्र कमलाबाई,मी एक स्वप्न पाहिलं!, दीपस्तंभ प्रकाशन,२०२१.

१२. गोखले द.न., चरित्र-चिंतन, मौज प्रकाशन गृह, मुंबई,२०००.

१३. काळुंखे रामचंद्र, नव अनुष्टुभ, मे-जुन,२०१४.

१४. आंधळे भरत, गरुडझेप-एक ध्येयवेडा प्रवास,श्री शिवसमर्थ सेवा प्रकाशन, २०२०.

१५. www.wikipedia.com

संशोधक विद्यार्थी

मोगल अनंत उद्धवराव

मार्गदर्शक

डॉ. झोडगे राजाराम अंकुशराव

मराठी विभाग प्रमुख

नूतन महाविद्यालय,सेलू, जि. परभणी